# मुंबईचा भिकारी

प्रकाशित:

१. दैनिक सकाळ मुक्तपीठ
२. सामान्यातले असामान्य पुस्तक


**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ



© पुनरारंभ



**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# मुंबईचा भिकारी

सर्व साधारण भिकारी म्हटला म्हणजे एक वेगळीच प्रतिमा आपल्या डोळयासमोर उभी राहते. कळकट कपडे न विंचरलेले केस, हातात भिक मागण्यासाठी ॲल्युमिनियमचे चेपलेले भांडे, खांद्यावर अडकविलेली थोडीफार फाटकी कधी न स्वच्छ केलेली पिशवी वगैरे वगैरे. त्याच्या स्वभाव धर्माबद्दल बोलायचे झाल्यास लागट बोलणे व भिक मागणे हाच एकमेव स्वभाव. जो दुस–याकडे सदैव याचना करून स्वतःचे उदरभरण करतो त्याच्या कडून मदतीची किंवा सहकार्याची अपेक्षा करणे म्हणजे वावगेच ठरणार नाही का? पण या कल्पनेला माझे बाबतीत फार मोठी तडा गेली व चक्क सांगून सुध्दा विश्वास बसणार अशी अनपेक्षित घटना घडली.

सन १९७९ सालची गोष्ट. मी तत्कालीन विदेश संचार सेवाह्यैछश्ह/विदेश संचार निगम लिमिटेड ह्यद्यश्ळह व वर्तमान टाटा कम्युनिकेशन्स (टाता छेम्) मध्ये हेड क्लार्क पदावर कार्यरत होतो. माझे पोस्टींग उत्तर प्रदेशात देहरादून येथे झाली होती. माझे ऑफिस देहरादून शहरात चकाता रोडवर होते व आम्ही ऑफिस पासून साधारण चार पाच किलोमिटर अंतरावर हरिद्वार रोडवर धरमपूरला रहात होतो. वार शनिवार, महिना अखेरीचा दिवस होता. नुकताच पगार झाला होता. मुलांना शहरात फिरवावे या हेतुने मी पत्नीला दोन्ही मुलांना घेउन माझे शहर ऑफिसात संध्याकाळी चार वाजता बोलवले होते. ऑफिस सुटलेवर साडे पाच वाजता पलटण बाजार, घंटाघर हा भाग फिरत फिरत बघून खरेदी करून घरी जाणार होतो. असा प्रोग्रॅम आधीच ठरला होता. ठरल्याप्रमाणे ती दोन्ही मुलांना घेउन माझे शहर ऑफिसला आली.

त्या दिवशी स्वतंत्र उत्तरांचल मागणी साठी स्थानिक लोकांनी आंदोलन केले होते. याची मला कल्पना नव्हती. आंदोलकांनी दुकाने बंद करण्याकरिता उग्र रूप धारण केले होते. चौकात दुकाने फोडली जात होती. हल्ला केला जात होता. त्याच वेळी आम्ही फिरत फिरत पलटण बाजारमध्ये प्रवेश केला. सुरवातीला बाजारात गर्दी असतेच तशी ही गर्दी असावी असे गृहित धरून आम्ही त्याच दिशेने वाटचाल करित होतो. आमचे आपसी बोलणे मराठी भाषेत चालू होते. आमचे बाजूलाच एक भिकारी उभा होता. त्याला आंदोलनाची कल्पना असावी.

आमचे मराठीतील संभाषण ऐकून तो पुढे आला व म्हणाला, “बाबूजी या गलीमधून जा.” सुरवातीला तो असे मराठीत बोलला याचे आश्चर्य वाटले व आम्ही त्याचे कडे बघतच राहिलो. तो परत तेच म्हणाला, “बाबूजी या गलीमधून जा.” माझ्या खिशात पगाराची रकम होती याची मला जाणीव झाली. कदाचित आम्हास लूटण्याचा त्याचा विचार असावा अशी शंका मनी आली म्हणून, मी त्याचे बोलण्याकडे दुर्लक्ष करित होतो. तो परत तेच म्हणाला, “बाबूजी या गलीमधून जा.” मग मात्र न राहवून मी त्यास कारण विचारले. “बाबूजी पुढचे चौकात दंगा झाला तुमचे बरोबर या माई (माझी पत्नी) व छोटे मुले आहेत.

खतरा आहे म्हणुन या गलीमधून जा.” तो बोलता झाला. समोर गर्दी दिसत होती पण त्याचेवर कीती विश्वास ठेवायचा हा प्रश्न होताच. “बाबूजी खरा सांगतो या गलीमधून जा.” असे तोडक्या मोडक्या मराठीत परत तो म्हणाला.

शेवटी त्याचे बोलण्यावर विश्वास ठेउन आम्ही गल्लीमध्ये जातो न जातो तोच मागील दुकाने फोडल्याचा आवाज झाला. एकदोघांनी प्रतिकार केला म्हणून आंदोलकांकरवी त्यांना प्रसाद दिल्याचे देखिल दिसले. वेळीच त्या भिका–याकडून योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे वाचलो अन्यथा आमचेवर दुर्धर प्रसंग ओढवला असता. एवढे करून तो सदगृहस्थ थांबला नाही तर गल्ल्या संपून मुख्य रस्ता लागेपर्यंत (आराघरपर्यंत) आम्हास मार्गदर्शन केले. तो आमचे बरोबर असल्यामुळे मनात परत एकदा शंकेची पाल चुकचुकली होती. वाटेत बोलता बोलता तो म्हणाला,“बाबूजी मी मुंबईत लोकल मंधी धा (दहा) वर्स (वर्ष) भीक मागली म्हणून मला मराठी येते.”

मुख्य रस्यास लागल्यावर मी कृतज्ञतापूर्वक दहा रूपयाची नोट देउ केली पण “मुंबईमंधी अपघाता वेळी सगळे धावतात व मदत करतात तसेच मी पण केले” म्हणत त्याने घेण्याचे नाकारले. त्याचे ते वागणे बघून मला सिंह व उंदराची गोष्ट आठवली. छोटया उंदीरांनी जाळे कुरतडून सिंहाची सुटका केली. ‘इवले इवले जीवही येती मोठया मोठया कामाला’ या ओळींची प्रचिती आली. पेशाने तो जरी भिकारी असला जाता जाता मानवतेचे दर्शन घडवून गेला व नंतर आम्हाला कधी दिसलाच नाही.